# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.10.2025** **वार:सोमवार**

---

1. 'वंदे मातरम्' या गीतानं देशभक्तीच्या भावनेला मूर्त स्वरूप दिलं-मन की बातमधून पंतप्रधानांचे गौरवोद्गार
2. ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ डॉक्टर जयंत नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार जाहीर
3. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दोन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर
4. नीरा देवघर प्रकल्पाच्या माध्यमातून माणदेश दुष्काळमुक्त करणार-मुख्यमंत्र्यांची ग्वाही आणि
5. आयसीसी महिला क्रिकेट स्पर्धेत भारत-बांग्लादेश सामना पावसामुळं अनिर्णित

**मन की बात**

'देशभक्ती ही शब्दांच्या पलीकडे असलेली भावना आहे आणि 'वंदे मातरम्' हे त्या अमूर्त भावनेला मूर्त स्वरूप देणारं, ऊर्जेचा प्रेरणास्रोत असणारं गीत आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. ते काल आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधत होते. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 19 व्या शतकात वंदे मातरम् लिहिलं असलं तरी त्याची भावना हजारो वर्षे जुन्या भारताच्या अमर चेतनेशी जोडलेली आहे, असं सांगून मोदी म्हणाले.....

**7 नवंबर को हम 'वन्देमातरम्' के 150वें वर्ष के उत्सव में प्रवेश करने वाले हैं। 150 वर्ष पूर्व 'वन्देमातरम्' की रचना हुई थी और 1896 (अट्ठारह सौ छियानवे) में गुरुदेव रवीन्द्रनाथ टैगोर ने पहली बार इसे गाया था। 'वन्देमातरम्' के गान में करोड़ों देशवासियों ने हमेशा राष्ट्र प्रेम के अपार उफान को महसूस किया है। 'वन्देमातरम्' हमारे इन प्रयासों में हमेशा हमारी प्रेरणा बनेगा।**

येत्या 7 नोव्हेंबरला वंदे मातरम् गीताला 150 वर्ष पूर्ण होत आहेत, यानिमित्त देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार आहेत, यासाठी नागरिकांनी VandeMatram150 या हॅशटॅगसह आपल्याला सूचना पाठवाव्यात असं आवाहनही पंतप्रधानांनी केलं.

संस्कृत भाषेचं महत्त्व, तिच्या संवर्धनासाठी होत असलेले प्रयत्न या विषयीही पंतप्रधानांनी भाष्य केलं. गुलामगिरीच्या काळात आणि स्वातंत्र्यानंतरही संस्कृतकडे सातत्याने दुर्लक्ष झालं. मात्र आता सोशल मीडियाच्या जगानं संस्कृतला नवीन जीवन दिलं आहे, हे अत्यंत आनंददायक असल्याचं ते म्हणाले. समाजमाध्यमावर संस्कृत भाषेतून रील्स प्रसारित करणाऱ्या यश साळुंके या तरुण संस्कृतप्रेमीचा त्यांनी उल्लेख केला. याबाबत आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना यश म्हणाला....

**माझा ओव्हरऑल हाच एक उद्देश आहे, की सगळ्या भारतीयांनी आपली जी प्राचीन भाषा आहे, त्याबद्दल थोडा तरी अभ्यास करावा. कारण याच भाषेमध्ये जेव्हा आपण विश्वगुरु होतो, तेव्हा आपल्या पूर्वजांनी जेवढं पण ज्ञान अर्पित केलं होतं, ते त्यांनी याच भाषेमध्ये लिहून ठेवलं आहे. तर माझा हाच एक उद्देश आहे, की सगळ्या भारतीयांनी थोडी तरी संस्कृत जाणावी आणि तुम्ही क्रिकेट खेळतो प्रोफेशनली, तर मी क्रिकेट आणि संस्कृतला कंबाईन करून एक रील बनवली होती तर ती त्यांना फार आवडली आणि ती त्यांनी मन की बातमध्ये दाखवलं याबद्दल मला खूप खूप आनंद वाटतो.**

येत्या 31 ऑक्टोबरला लोहपुरुष सरदार पटेल यांच्या जयंतीदिनानिमित्त त्यांच्या कार्याचं स्मरण पंतप्रधानांनी केलं, यानिमित्त देशभरात आयोजित होणाऱ्या 'रन फॉर युनिटी'मध्ये सहभागी होण्याचं आवाहनही त्यांनी केलं. दिवाळी आणि छट पूजेसारख्या सणासुदीच्या काळात देशभरात जीएसटी बचत महोत्सव सुरू आहे, यामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह आहे, असं मोदी म्हणाले. स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाविषयीच्या अभिनव उपक्रमांबद्दल पंतप्रधानांनी माहिती दिली. सागरी परिसंस्थेच्या जतन संवर्धनासाठी खारफुटीचं महत्व त्यांनी अधोरेखित केलं. एक पेड़ माँ के नाम ही मोहीम आणखी पुढे न्यावी, असं आवाहनही त्यांनी केलं.

**विज्ञान पुरस्कार**

ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ डॉक्टर जयंत नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. केंद्र सरकारतर्फे देण्यात येणारे राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार शनिवारी जाहीर करण्यात आले. यंदा एकंदर 24 शास्त्रज्ञांना पुरस्कार जाहीर झाले आहेत, यात मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे कुलगुरू डॉक्टर अनिरुद्ध पंडित आणि नागपूरच्या राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एस. वेंकट मोहन, यांना 'विज्ञान श्री' पुरस्कार; तर पुण्याच्या आयुकामधील प्राध्यापक डॉक्टर सुहृद मोरे आणि बंगळुरूच्या नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेसमधील डॉक्टर दीपा आगाशे यांना 'विज्ञान युवा-शांतीस्वरूप भटनागर पुरस्कार' जाहीर झाला आहे. कृषी विज्ञानातील योगदानासाठी टीम अरोमा मिशनची विज्ञान टीम पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

**अमित शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा राज्याच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. काल संध्याकाळी त्यांचं मुंबईत आगमन झालं. ते आज मुंबईत इंडिया मॅरिटाईम वीक या पाच दिवसीय परिषदेचं उद्घाटन करणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यावेळी उपस्थित असतील. याशिवाय, गृहमंत्री शहा आज माझगांव गोदीत खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या विशेष नौकांच्या चाव्या लाभार्थ्यांना सुपूर्द करणार आहेत.

**मुख्यमंत्री-सातारा**

'नीरा देवघर प्रकल्पामुळं फलटण आणि माळशिरसला पाणी मिळणार आहे; या भागातला वर्षानुवर्षांचा दुष्काळ दूर करुन हरित माणदेश निर्माण करणं हे सरकारचं उद्दिष्ट आहे', असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नीरा देवघर प्रकल्पाच्या उजव्या कालव्याच्या दुसऱ्या टप्प्यासह 1 हजार 352 कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं भूमीपूजन आणि लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल फलटण इथं झालं. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले.....

**आज अवस्था अशी आहे की, सगळी कामं पूर्ण झाल्यानंतर माणदेशातला दुष्काळ शोधावा लागेल, तो सापडणार नाही पूर्णपणे त्या ठिकाणी हरित अशा प्रकारचा माणदेश तयार करण्याचं काम आम्ही करतो आहोत.**

यावेळी मुख्यमंत्र्यांनी डॉक्टर संपदा मुंडे यांच्या आत्महत्येबद्दल दुःख व्यक्त केलं, तसंच त्यांच्या आत्महत्येला जबाबदार असणाऱ्यांना कठोर शिक्षा होईल, असं आश्वासन दिलं.

**एकनाथ शिंदे-आळंदी**

इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्याचा शासनाचा संकल्प असून या प्रकल्पासाठी सर्व संबंधित विभागांनी एकत्र येऊन कार्य करावं, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिले. हे कार्य केवळ पर्यावरण संवर्धनाचंच नव्हे तर आपल्या श्रद्धेचंही आहे. त्यामुळं प्रत्येक नागरिकानं या उपक्रमात आपलं योगदान द्यावं, असं आवाहन त्यांनी केलं. आळंदी नगरपरिषदेच्या विविध विकासकामांचं भूमिपूजन आणि शुभारंभ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. कार्तिकी वारीपूर्वी रस्त्यांच्या डागडुजीची कामं पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या कामासाठी नगरविकास विभागामार्फत एक कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचंही शिंदे यांनी नमूद केलं.

**अजित पवार-सातारा**

लोकशाहीर कृष्णराव साबळे यांच्या स्मारकाच्या कोनशिलेचं अनावरण वाई तालुक्यात पसरणी इथं उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल झालं. पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित लोकशाहीर कृष्णाराव साबळे यांचं सामाजिक आणि स्वातंत्र्य संग्रामातील योगदान मोलाचं आहे. त्यांनी महाराष्ट्राची लोकधारा या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राची लोकसंस्कृती देशभरात पोहोचवली. त्यांच्या जन्मगावी पसरणी इथं स्मारक उभारणीसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही पवार यांनी दिली. शाहीर साबळे यांच्या नावाला शोभेल आणि  हाराष्ट्राला अभिमान वाटेल, असं स्मारक उभारावं, असं ते म्हणाले.

**दर्शन-कोल्हापूर**

दिवाळीच्या सुट्यांमुळं कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटनस्थळ गर्दीनं फुलून गेली आहेत. करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येत आहेत. गेल्या आठ दिवसांत 10 लाखांहून अधिक भाविकांनी देवीचं दर्शन घेतलं आहे. भाविकांची गर्दी लक्षात घेऊन दर्शनासाठी पहाटे साडेतीन ते रात्री पावणेदहा वाजेपर्यंत मंदिर दर्शन सुरू राहणार आहे. श्री क्षेत्र जोतिबा आणि देवस्थान समितीच्या अख्त्यारीतील सर्व मंदिरं दर्शनासाठी खुली राहणार आहेत.

**पालखी-धाराशिव**

धाराशिव तालुक्यातील तेर इथल्या संत गोरोबाकाका यांच्या पालखीचं काल धाराशिव शहरात मोठ्या भक्तीभावाने स्वागत करण्यात आलं. ही पालखी कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे मार्गस्थ झाली.

**मोहोळ-क्रीडा**

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यात होत असलेल्या पहिल्या खासदार क्रीडा महोत्सवाच्या अजिंक्य या शुभंकरचं अनावरण काल करण्यात आलं. अर्जुन पुरस्कार विजेते ऑलिम्पिकपटू मनोज पिंगळे, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या मोहिनी चाफेकर यावेळी उपस्थित होते. येत्या 2 ते 16 नोव्हेंबर या कालावधीत हा खासदार क्रीडा महोत्सव होणार आहे. या महोत्सवात शहरातील विविध मैदानांवर 37 प्रकारच्या क्रीडा स्पर्धा होणार आहेत.

**महिला-क्रिकेट**

आयसीसी महिला विश्व करंडक स्पर्धेत काल नवी मुंबईतील भारत-बांग्लादेश दरम्यानचा सामना पावसामुळं अखेर अनिर्णित राहिला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांग्लादेशनं मर्यादित 27 षटकांमध्ये 9 बाद 119 धावा केल्या. भारतीय महिलांनी नाबाद 57 धावांपर्यंत मजल मारली असताना पाऊस थांबण्याचं चिन्ह नव्हतं, त्यामुळं सामना अनिर्णित ठेवावा लागला.

**पाऊस**

मुंबई पुण्यासह राज्याच्या विविध भागात काल पाऊस पडला. नाशिक जिल्ह्यातील अनेक भागात झालेल्या जोरदार पावसामुळं काढणीला आलेला कांदा, सोयाबीन, मका, टोमॅटो, भाजीपाला पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. भंडारा आणि गोंदियात पावसामुळं धान पिकाला मोठा फटका बसला आहे, तर जालना जिल्ह्यात वेचणीला आलेल्या कापसाचं या पावसानं नुकसान होत आहे. धुळे आणि पालघर जिल्ह्यातही काल पावसाच्या सरी पडल्या.

**हवामान**

कोकणात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली. कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.